# राशिभविष्य - ऑगस्ट, २०१२.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

==========================================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळींना या महिन्याची ग्रहस्थिती फ़ारशी अनुकुल नाहीच असेच म्हणावे लागेल. त्यामुळे या राशीच्या मंडळीनी सदैव सावधानतेने आचरण करावे व अत्यंत सहनशील बनून मन व बुद्धीवर ताबा ठेवून पतिकुल काळाशी मुकाबला करावा, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. अशा परिस्थितीत गुरु-शुक्रासारख्या शुभ ग्रहांची साथच आपणांस तारून नेईल. व होणारा असह्य मनस्तापही पुष्कळ प्रमाणात कमी होईल. सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडत असल्यामुळे शारीरिक-मानसिक आरोग्य बिघडण्याची शक्यता दिसते. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी विशेष जपले पाहिजे. नोकरी-व्यवसाय कोणताही असो, सहजगत्या कोणतीही अपेक्षित गोष्ट साध्य होणे संभवत नाही. जन्मकुंडलीत योग असतील त्यांना शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने काही प्रमाणात अपेक्षापूर्तीचे सुखसमाधान लाभू शकेल. महिन्याच्या पूर्वार्धात कौटुंबिक सुखात व उत्तरार्धात वैवाहिक जीवनातील सुखात व संततिसुखात बाधा येणे संभवते. तसेच या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे येतीलसे दिसते. कुमार्गी मित्रांपासून दूर राहावे. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्ध अतिशय अनुकुल होईल. तेव्हा जे काय साधावयाचे ते या राशीच्या मंडळीनी महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा अटोकाट प्रयत्न करावा.शासकीय, निमशासकीय सेवेत असणारांनी आपले कर्तृत्व सिद्ध केल्यास वरिष्ठ प्रसन्न होतील व त्यामुळे विविध प्रकारचे लाभ प्राप्त होतील. पण बुध प्रतिकुल असल्यामुळे हितशत्रूंचा त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना व लेखकांना प्रगती व यश मिळण्यास काळ अनुकुल होईल. आर्थिक लाभ होतील. आरोग्य सुधारेल व काहींना बढतीचे योगही येतील. शुक्रामुळे कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल; पण उत्तरार्धात गृहसौख्यात बाधा येण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या पूर्वार्धात विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. दिनांक ८-९ या दोन दिवशी विशेष जपावे. महिन्याच्या उत्तरार्धात उष्णताविकारांचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी विशेष जपावे. मानसोपचार तज्ज्न्य व द्रव पदार्थाचे व्यापारी यांना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल व लाभदायक होईल. इतरांच्या व्यवसायात अस्थिर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे.

**मिथुन -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात विविध कारणांनी कौटुंबिक सुख व गृहसौख्य मिळण्यात अडथळे निर्माण होतीलसे दिसते. त्यामुळे अध्यात्म-साधना व उपासनेत रस असेल तर होणारा त्रास उपासनेद्वारे सुसह्य होईल. तसेच सामाजिक कार्यात कार्यरत असणारांनाही उपासनेद्वारेच होणारा त्रास सुसह्य होईल. शिवोपासना अनुकुल होईल. गुरु व नेपच्यून हे दोन ग्रह अशा उपासनेस अनुकुल होतील. महिन्याच्या पूर्वार्धात रवि-बुध व मंगळ-शनि हे चार ग्रह प्रतिकुल असल्यामुळे मनस्ताप देणारे व अनारोग्यकारक आहेत. त्यामुळे विशेष करून रक्तदाब व हृदयविकार असणारांनी अति विचार करू नये व मन सतत शांत ठेवण्याचा प्रयत्न करावा. तरच आरोग्य फ़ारसे बिघडणार नाही. शनि-मंगळ हे दोन्ही ग्रह प्रतिकुल असल्यामुळे कौटुंबिक सुखात व गहसौख्यात

विविध कारणांनी बाधा येणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात हे दोन्ही ग्रह संततिसुखाचे दृष्टीने मनस्ताप देणारे असेच सिद्ध होतील. अनारोग्यामुळे किंवा आचरणविषयक समस्येमुळे या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत बाधा येणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना काळ अनुकुल, प्रगतिकारक व मनोकामना पूर्णत्वास नेण्यास उपयुक्त होईल. या राशीच्या काही मंडळीना परदेशगमनाचा योग संभवतो.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात विविध कारणांनी कौटुंबिक सुख व गृहसौख्य मिळणे कठिण होईलसे दिसते. विशेष करून या महिन्याच्या पहिल्या चार दिवसांत अपघात भय संभवते. जपा. अत्यंत सावधानतेने सतत आचरण करा. शारीरिक इजा होणे संभवते. रवि-बुधाच्या प्रतिकुलतेमुळे शारीरिक-मानसिक अनारोग्य होण्याची शक्यता आहे. .जपा. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी विशेष काळजी घ्यावी. गुरु-मंगळाच्या शुभ योगामुळे व शुक्रामुळे मधून मधून काही मनोनुकुल घटना घडतील व त्यामुळे मनावरील ताण खूपच कमी होईल. पंचम स्थानी असलेल्या राहूमुळे मुलांपैकी कोणाचे अनारोग्य, कोणाची आचरणविषयक समस्या,अभ्यासाकडे दुर्लक्ष अशापैकी कारणांनी अपेक्षित संततिसुख मिळण्याची शक्यता दिसत नाही. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. कसल्या तरी मोहात मन अडकल्याने या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होतील. जपा. विषभय, जलभय आहे. जपा. शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र, कमिशन, दलाली व्यवसाय असणारांनासंपूर्ण महिन्याचा काल अनुकुल होईल. यांत्रिक तांत्रिक व्यवसाय, वकिली व्यवसाय असणारांना मात्र महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होईल. या राशीच्या काही मंडळीना परदेशगमनाचे तर काहींना दूरच्या प्रवासाचे योग संभवतात.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात अपेक्षित कौटुंबिक सुख व दाम्पत्यजीवनातील सुख मिळविण्यासाठी विचारपूर्वक आचरण करणे अगत्याचे होईल. सतत मनाविरुद्ध घटना घडण्याची शक्यता असल्याने आपल्या अहंकारी व अधिकारशाही स्वभावाला संयम व सहनशीलतेच्या आचरणाचा लगाम लावून ताब्यात ठेवता आले तर खूपच सुखाचे होईल. त्यामुळे सर्व प्रकारचे आरोग्यही उत्तम राहील नपेक्षा शारीरिक-मानसिक थकवा येणे, रक्तदाब वाढणे, अकारण श्रम, दगदग होणे, शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकार बळावणे शक्य आहे. जपा. विचाराच्या तंद्रीत वाहन चालवू नका. अपघातभय आहे. जपा. शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व मन आणि बुद्धीवरील ताण कमी होईल. वकिली, कोळसा, खाण उद्योग, वैद्यकीय व्यवसाय, यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय, कलाक्षेत्रातील व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. पण महिन्याच्या पूर्वार्धात आर्थिक चिंता उत्पन्न होणे संभवते. शिक्षण, शास्त्रीय संशोधन, अन्य बौद्धिक व्यवसाय असणारांपैकी कोणास मनसन्मान, उच्च पद, बढती अशापैकी काही प्राप्त होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या मंडळीनी सध्या नव्याने व्यापार-व्यवसाय सुरू करण्याचा विचारही करू नये. नोकरीच करावी, हे उत्तम,

**(६) कन्या -** जीवनसाथीचे लहरी व विक्षिप्त आचरण, दोघांमधील मतभेद व भांडणे यामुळे या राशीच्या मंडळींच्या दांपत्यजीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. शनिदेवांच्या साडेसातीचा काळ व सध्या शनि-मंगळ दोघेही प्रतिकुल असल्यामुळे या राशीच्या मंडळीनी मन व बुद्धीवर नियंत्रण ठेवून व सहनशीलतेचे आचरण करून काळ व्यतीत करणेच सुखाचे होईल. हाती घेतलेल्या

कार्यात अडथळे येणे, आर्थिक चिंता निर्माण होणे, कुटुंबात अनिष्ट घटना घडणे, शारीरिक उष्णता भडकून डोळे, घसा, मान दाढा अशापैकी कशाचा तरी आजार होणे, श्रम, दगदग होऊन शरीरपीडा सहन करावी लागणे, कोर्ट प्रकरणे असतील तर त्यात अपयश येणे, भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल तर त्यात अडथळे निर्माण होणे अशापैकी एखाद्या घटनेमुळे मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. भाग्यस्थानी असलेल्या गुरुमुळे अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे सात्विक सुखसमाधान लाभेल. पण केतुमुळे अपेक्षित संततिसुख लाभण्यात अडथळे निर्माण होण्याची शक्यता दिसते. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल असेल. त्यामुळे त्यांनी जे काही साधावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. राहूमुळे भावंडसुखात बाधा येणे संभवते. जपा.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात शनि-मंगळ हे दोन ग्रह पूर्णपणे प्रतिकुल तर रवि-बुध हे दोन ग्रह पूर्णपणे अनुकुल होणार आहेत. त्यामुळे नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने काळ बऱ्याच प्रमाणात अनुकुल तर कौटुंबिक सुख व मानसिक सुखाचे दृष्टीने काळ पूर्णपणे प्रतिकुल होईल, असेच म्हणावेसे वाटते. या राशीच्या मंडळीनी या प्रतिकुल काळात आर्थिक व्यवहार अतिशय जपून व विचारपूर्वकच करावेत. नपेक्षा मानहानी सहन करावी लागण्याची शक्यता दिसते. काही दबलेली जुनी प्रकरणे असतील तर ती पुन्हा उकरली जाऊन असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. विशेष करून दिनांक २५ ते २७ हे तीन दिवस अत्यंत सावधानतेने आचरण करणेच हिताचे होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना या महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक असल्याचा अनुभव येईल. काही मंडळीना उच्च पद, काहीना मानसन्मान, काहीना प्रसिद्धी तर काहीना बढती अशा प्रकारचे लाभ होतीलसे दिसते. अध्यात्माची आवड असणारांना उपासनेद्वारे सात्विक सुखशांति लाभेल. या राशीच्या काहींना मुदतीचा ताप येणे संभवते; तर काहींना असह्य डोकेदुखीचा त्रास सहन करावा लागेल. काहीना, त्वचारोग, रक्तविकार, मुख-दंतविकार अशापैकी कसला तरी त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल.

**(८) वृश्चिक -** या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींचे मन अतिशय चंचल, अस्थिर असे राहीलसे वाटते. त्यामुळे हातून नको ते घडून अपमानित व्हावे लागेल. जपा. अशा परिस्थितीत या राशीच्या काही मंडःळीना "नको हा संसार !" असे वाटून वैराग्य घ्यावेसे वाटेल. त्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखसमाधानही या मंडळीना मिळणार नाही. पण ही भावना मनावरील ताण नाहीसा होईपर्यंतच राहील. या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतीचा विवाहयोग जुळून येण्याची शक्यता आहे. काही कोर्टप्रकरणे असतील तर या राशीच्या मंडळीनी ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा, कारण काळ अनुकुल नाही. गैरसमजाने घरगुती संबंधात घोटाळे, संशयाची परिस्थिती निर्माण होणे संभवते. जपा. बौद्धिक कार्यक्षेत्र, गूढ संशोधन कार्यक्षेत्र, कलाक्षेत्र, साहित्यनिर्मिती क्षेत्र असणारांना प्रगतीच्या दृष्टीने काळ अनुकुल होईल. अष्टम स्थानी असलेल्या शुक्रामुळे कलाकारांना मान, प्रतिष्ठा लाभेल; तर जन्मकुंडलीत योग असतील तर काहीना धनलाभ वा भूमिलाभ होणेही शक्य आहे. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. इतरांना कष्ट, श्रम, दगदग सहन करूनच अपेक्षित अर्थलाभ प्राप्त करावा लागेल. मित्रांशी वितुष्ट येण्याची शक्यता दिसते.

जपा.

**(९) धनु -** या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याच्या काळात नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागेलसे दिसते. तसेच वैरिष्टांशी वाद, भांडणे होणेही शक्य दिसते. स्वतंत्र व्यवसाय करत असणारांच्या व्यवसायात अडचणी, अडथळे, निर्माण होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या काहींना जुने टाकून नवीन काही तरी करण्याची ऊर्मी येईल. कोळसा, लोखंड यांचे व्यापारी व वकिलीसारखा चिकित्सक बौद्धिक व्यवसाय असणारांना काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात जन्मकुंडलीत योग असतील तर या राशीच्या काहींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणे संभवते. या राशीच्या मंडळीच्या जीवनसाथीस व मुलांना कसला तरी त्रास वा आजार असल्याने त्यांना अपेक्षित वैवाहिक जीवनातील सुख व संततिसुख मिळेलसे वाटत नाही. राहूमुळे हितशत्रूंपासून रक्षण होईल, काहींना अर्थलाभ होईल तर काहीना परदेशगमनाचे योग येतील. गुरु-केतु अनुकुल असल्याने सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राहील, हातून सत्कार्य घडेल व मन उदार होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या हर्षलमुळे मात्र सर्व काही ठीक असूनही कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभण्यात अडथळे निर्माण होतील. काहींना जलप्रवासाचे तर काहीना परदेशगमनाचे योग येतील. अध्यात्मात रस असेल तर या राशीच्या मंडळीना उपासनेद्वारे आंतरिक सुखसमाधान मिळू शकेल.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या २१-२२ व २८-२९ या चार दिवशी विशेष जपावे. सावधानतेनेच सर्व कर्तव्ये पार पाडावीत. कोणत्याही मोहाला बळी पडू नये. महिन्याच्या पूर्वार्धात शक्यतो प्रवास करू नका. मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात प्रवास करण्यास हरकत नाही. परदेशगमनाचा योग संभवतो. महिन्याचा पूर्वार्ध वकिली, अन्य चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, कोळसा, खाण उद्योग, रसायने असे व्यवसाय असणाराना अनुकुल प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण उत्तरार्धात मंगळामुळे व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होण्याची शक्यता दिसते. नोकरदार मंडळीना कामाचा ताण,वरिष्ठांशी मतभेद, वाद, मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. जपा. या राशीच्या काहीना बढती, पगारवाढ मिळणे संभवते. वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह टाळाच. श्रद्धा असेल तर उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती होईल व सात्विक सुखसमाधान लाभेल. पण संततिसुखाचे दृष्टीने काळ प्रतिकुल होईल. मुलांपैकी कोणाची आचरणविषयक समस्या, कोणाचे अभ्यासाकडे दुर्लक्ष अशापैकी समस्या मनस्ताप देतील. महिन्याच्या पूर्वार्धात दाम्पत्यजीवनात स्वत:चे वा जीवनसाथीचे अनारोग्य, काहींना पोटाच्या विकाराचा तर काहीना मूत्राशयविकाराचा त्रास होणे संभवते. आर्थिक व्यवहार सावधानतेने करा. आर्थिक चिंता होणे संभवते. जपा.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळींचे मन अतिशय कोमल झाले असल्यामुळे मनाविरुद्ध थोडेही घडले की लगेच मनाला गहरे औदासीन्य येत असावे, असे वाटते. तसेच बुद्धी अस्थिर व चंचल झाली असल्यास हातून अविचाराची कृत्ये होत असण्याची शक्यता जाणवते. पण या राशीच्या मंडळीनी मन, बुद्धी आणि जिभेला लगाम घालून आचरण केल्यास खूपच सुखाचे होईल व जपलेले संबंध तुटणार नाहीत. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल; पण नातेवाईक मंडळीकडून त्रास होणे संभवते. जपा. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याचा

पूर्वार्धच अनुकुल असून त्यांनी जे काही साधावयाचे ते पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. उत्तरार्धात या राशीच्या मंडळींचे आरोग्य बिघडण्याची शक्यता दिसते. विशेष करून अपचन, पोटाचे विकार, मूत्राशयविकार अशापैकी आजार त्रस्त करतीलसे दिसते. जपा. काहीना मूळव्याधीसारख्या उष्णताविकारांचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. काहीना दूरच्या प्रवासाचे तर काहीना परदेशगमनाचे योग संभवतात. पण प्रवासात त्रास, मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व होणारा मनस्ताप सुसह्य होईल.

**(१२) मीन -** सध्या या राशीच्या मंडळीचा स्वभाव अतिशय चंचल, अस्थिर, लहरी, कसलेही दडपण सहन न होणारा असा झाला असण्याची शक्यता दिसते. तसे असेल तर त्यांनी स्वतःच प्रयत्न करून मनावर व बुद्धीवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तसे झाले तर हातून शात्रीय संशोधनात्मक काही कार्य घडू शकेल. शिवाय गुरु ग्रहाची अनुकुलता असल्याने एखाद्या विषयावर उपयुक्त असे ग्रंथलेखनही होऊ शकेल. अध्यात्मात रस असेल तर उपासनेद्वारे अध्यात्मात प्रगती होईल व मन व बुद्धी स्थिर व सशक्त होईल. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. या राशीच्या शेतकरी बंधूंना शेतीपासून अपेक्षित लाभ होईल. कौटुंबिक सुखसमाधान लाभून गृहसौख्यही लाभेल. मात्र दांपत्यजीवनात विविध कारणांनी मनस्तापच सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. भागीदारी व्यापार-व्यवसाय असणारांनी भागीदारीत संशयाची परिस्थिती निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी. कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. महिन्याच्या उत्तरार्धात उष्णताविकारांचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. जपा.

==========00000==========